शा.फो.झिं.मु.,पुणे-सीए-१९८/(५०० पुस्तके)१०-१३

[विशेष-घ. आ. (मुं. सा. वि.) ५०-म.

No. 25751

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

## संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम, २१)

नोंदणी क्रमांक महा. 1028 /2015/पुणे
दिनांक 12/8 /2015/पुणे

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, फिनिक्स वर्ल्ड एज्युकेशन सोसायटी, वॉर्ड क्रं. ६, घर नं. २६८० महाबळेश्वरनगर, मु. पो. शिक्रापूर, ता. शिरुर, जि. पुणे खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम, २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली. श्री मंगेश अशोक मुजबळ

तारीख :- 12/8/2015 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

Assit. Registrar of Society Pune Region, Pune

12/08/15

महाराष्ट्र संस्था निबंधक, संस्थांचे सहायक निबंधक,
पुणे विभाग, पुणे
.................... विभाग.

5

सत्यमेव जयते

# नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) च्या अन्वये पुणे विभाग, पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव 'फिनिक्स वर्ल्ड एज्युकेशन सोसायटी' वार्ड क्र. ६, घर नं. २६६०, महाबळेश्वर नगर, मु. पो. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे - 412208

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक F-46004/Pune

श्री. मंगेश अशोक भुजबळ यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 30/11/2015 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

Asst. Charity Commissioner Pune

सही 30/11/15

सहाय्यक धर्मादाय आयुक्त

पदनाम पुणे विभाग, पुणे

3453 /15 कलम

मि. सतीश मु. पिंगळे

दिनांक:- 28/8/15

07/09/15

अधीक्षक
सार्वजनिक न्याय नोंदणी
कार्यालय पुणे विभाग पुणे

Asst. Charity Commissioner * Pune *

महा. 1028 /2015/पुणे
दिनांक 12 / 8 /2015/पुणे

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

# परिशिष्ट - "ब"

## ज्ञापन

## फिनिक्स वर्ल्ड एज्युकेशन सोसायटी

**वॉर्ड क्र.६, घर नं. २६८०, महाबळेश्वरनगर, मु.पो.शिक्रापूर,**

**ता.शिरुर,जि.पुणे - ४१२ २०८**

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

**(1) संस्थेचे नांव :-** फिनिक्स वर्ल्ड एज्युकेशन सोसायटी

**(2) संस्थेचा कार्यालयाचा पत्ता :-** द्वारा सौ. कमल अशोक भुजबळ
वॉर्ड क्र.६, घर नं. २६८०, महाबळेश्वरनगर,
मु.पो.शिक्रापूर,ता.शिरुर,जि.पुणे- ४१२ २०८

**(3) संस्थेचे ध्येय व उद्देश :-**

१. संस्थेमार्फत शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी इंग्रजी व मराठी माध्यमाच्या शाळा सुरु करणे. अंगणवाडी,बालवाडी, नर्सरी (ज्युनिअर व सिनिअर केजी), पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक शाळा, महाविद्यालय स्थापन करुन संस्थे अंतर्गत सुरु करणे तसेच निवासीशाळा, आश्रमशाळा सुरु करणे. व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासास सहाय्यभुत होणे.

२. संस्थेमार्फत स्पीकींग इंग्लीश स्कूल सुरु करणे. निसर्गोपचार उपचार-प्रचार-प्रसार व प्रशिक्षण देणे. बालवाडी शिक्षिका कोर्स पत्राद्वारे/नियमीत सुरु करणे. स्पर्धा परीक्षा (एम. पी.एस.सी.,यु.पी.एस.सी.,एस.एस.सी. इ.) पुर्व तयारी वर्ग घेणे. तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या खेड्यातील विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारची शैक्षणिक मदत उदा.साहित्य, पुस्तके व इतर आवश्यक ती मदत पुरविणे. पोलीस भरती पुर्व तयारी वर्ग घेणे.

श्री. सागर महादेव मांढरे
विशेष कार्यकारी अधिकारी (८६९१)
शिक्रापूर,ता.शिरुर जि.पुणे.

३. महिलांसाठी कन्याशाळा, कन्या विद्यालय, महिला महाविद्यालय सुरु करणे. महिला वसतीगृह सुरु करणे. महिला आधारगृह सुरु करणे.

४. गरजु मुलांच्या विकासासाठी शालेय, आर्थिक व वैद्यकीय मदत तसेच इतर कल्याणकारी योजना आखुन त्यांची अंमलबजावणी करणे. गरजु मुलांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत करणे. तसेच असे कार्य करणाऱ्या संस्थांना सहकार्य करणे.

RSTodkar

| ( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) | ( सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर ) | ( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

Asst. Charity Commissioner ★ Pune ★



५. मुलांमध्ये प्रेम, बंधुभाव, वृध्दींगत होण्यासाठी योग्य ते प्रयत्न करणे व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, बक्षिसे व पुरस्कार देणे.

६. मुलांनी संस्कारक्षम, चांगले व जबाबदार नागरिक बनावे त्यांचे व्यक्तीमत्व विकसीत व्हावे असे संस्कारक्षम शिक्षण त्यांना देणे. तसेच आदर्श व शैक्षणिक चित्रपट दाखविणे.

७. गरीब, होतकरु, अपंग, व्यंग, निराधार, अनाथ, दुर्बल, मुक बधिर असलेल्या विद्यार्थ्यांची सर्वांगीण शैक्षणिक प्रगती होण्यासाठी सहाय्य व मदत करणे.

८. विद्यार्थ्यांना वैद्यकीय मदत, आरोग्य विषयक सुविधा, हॉस्पिटल, नर्सिंग कोर्स, शारिरीक शिक्षण, व्यायामशाळा, जलतरण तलाव, प्रयोग शाळा स्थापन करुन सेवा उपलब्ध करुन देणे.

९. संस्थेमार्फत टेक्निकल, मॅनेजमेंट इन्स्टिटयुट सुरु करणे. त्यात विद्यार्थ्यांना यांत्रिक, तांत्रिक, औद्योगिक विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करणे. त्यासाठी प्रशिक्षण वर्ग घेणे व त्यात विविध कोर्सेस उपलब्ध करुन देणे. उदा. व्होकेशनल टेक्निकल, इलेक्ट्रॉनिक्स, टेलरिंग,भरतकाम रेडीओ, फॅन, टेलिफोन, मिक्सर, ग्राईंडर, मोबाईल दुरुस्ती, वॉशिंग मशिन, टेपरेकॉर्डर, फ्रीज, एअरकंडीशन दुरुस्ती, वाहन व इलेक्ट्रीक दुरुस्ती कोर्स स्क्रीन प्रिंटींग इन्स्टिटयुट व तसेच ब्युटीपार्लरचे प्रशिक्षण देणे. संगणक प्रशिक्षण, फॅशन डिझायनिंग, आर्ट व क्राफ्ट प्रशिक्षण इत्यादी.

१०. व्यावसायिक शिक्षण, संगणक शिक्षण, तांत्रिक शिक्षण, यांत्रिक शिक्षण, अध्यापक विद्यालय (डी.एड.व बी.एड.कॉलेज ), इंजिनिअरिंग शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, आयुर्वेदीक शिक्षण,पॅरा मेडीकल, आर्किटेक्चर, पॉलिटेक्निक, योगा प्रशिक्षण, कृषी प्रशिक्षण,संगित शिक्षण सौर ऊर्जा शिक्षण, कायद्याचे शिक्षण, होम सायन्स, सौंदर्य शास्त्र, सौर ऊर्जा,मॅनेजमेंट/व्यवस्थापन प्रशिक्षण, आर्मी, नेव्ही, एअरफोर्स, पोलीस भरती पूर्वचे प्रशिक्षण देणे व इतर सर्व प्रकारचे शिक्षण की विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यात उपयोग होईल असे सर्व प्रकारचे रोजगाराभिमुख कोर्सेसचे मार्गदर्शनपर शिक्षण देण्यासाठी जरुर ते सर्व प्रकारचे प्रयत्न करणे. व्यक्तीमत्व विकास व अभ्यासतंत्र याचे सामाजिक प्रशिक्षण देणे.

११. संस्थेतर्फे संगणक (सॉफ्टवेअर/हार्डवेअर) विषयक विविध शैक्षणिक, व्यावसायिक, प्रशिक्षण वर्ग/ अभ्यासक्रम सुरु करणे. संगणकाचे ज्ञान, महत्व व माहिती समाजातील लोकांपर्यंत पोहचविणे.

| ( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) | ( सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर ) | ( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

Asst. Charity Commissioner Pune

१२. संस्थेतर्फे शैक्षणिक संस्थांना मदत करणे. तसेच समाजातील निरनिराळ्या थरातील व आदिवासी विद्यार्थ्यांकरीता वसतीगृह व अनाथालय सुरु करणे.

१३. संस्थेमार्फत सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा व सांघिक खेळ आयोजित करणे व त्यासाठी क्रिडांगणे व इतर सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देणे.

१४. वरील सर्व उद्देश चांगल्या व योग्य प्रकारे साध्य करण्यासाठी सभा बोलावणे, चर्चासत्र, व्याख्यानमाला, परिसंवाद, शिबिर, मेळावे, संशोधन करणे, प्रदर्शन भरविणे, दृक व श्राव्य माध्यमाचा उपयोग करणे. इतर ठिकाणांना भेटी देणे व चर्चा करणे तसेच सर्व गोष्टींची मदत करणे.

१५. शैक्षणिक संस्थांसंबंधीत विविध क्षेत्रात ज्यांनी बहुमोल मार्गदर्शनपर व मोलाचे कार्य केले आहे अशा थोर, मान्यवर व कर्तुत्वान व्यक्तींचे विचार लोकांपर्यंत पोहचविणे.

१६. संस्थेमार्फत सुसज्ज व भव्य ग्रंथालय व वाचनालय सुरु करणे.

१७. संस्थेमार्फत स्कॉलरशिप व इतर स्पर्धा परीक्षांचे आयोजन करणे व घेणे, चित्रकला व हस्तकला प्रशिक्षण, रात्रकालीन शाळा व महाविद्यालय, अंधशाळा, आश्रमशाळा, निवासीशाळा, श्रमिक विद्यापीठ, संगीत महाविद्यालय, वसतीगृह, वृध्दाश्रम विविध प्रकारचे देशी विदेशी खेळांना प्रोत्साहन देऊन उत्कृष्ट खेळाडू निर्माण करणे.

१८. संस्थेमार्फत विविध शैक्षणिक अनुदान घेऊन संशोधन प्रकल्प कार्यान्वित करणे. व ते संस्थेच्यावतीने सुरु करणे.

१९. संस्थेमार्फत विविध कल्याणकारी उपक्रम सुरु करणे. त्यामध्ये भरतकाम, विणकाम, शिवणकाम, संगणक, हॉटेल मॅनेजमेंट, पाककला, खाद्य पदार्थ निर्मिती, फॅशन डिझायनर, वाहन चालक, संस्कार वर्ग, ब्युटी पार्लरचे कोर्सेस, हेल्थ क्लब, मसाज प्रशिक्षण, मेहंदी, रांगोळी, चित्रकला, हस्तकला, सिरॅमिक, पेन्टींग इत्यादींचे कोर्सेस/प्रशिक्षण वर्ग आयोजित करून महिलांना प्रशिक्षित करणे.

२०. गरीब, होतकरु, हुशार मुलांसाठी शालेय साहित्याचे वाटप करणे. उदा. वह्या, पुस्तके, कपडे, शैक्षणिक साहित्य इत्यादी तसेच हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.

२१. संस्थेमार्फत विविध क्रिडाविषयक उपक्रम सुरु करणे. विविध क्रिडा स्पर्धा आयोजित करणे व पार पाडणे. तसेच आधुनिक साहित्य सामुग्रीनेयुक्त अशी अद्ययावत व्यायाम शाळा युवकासाठी सुरु करणे. क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे.

| | | |
|---|---|---|
| ( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) | ( सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर ) | ( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

२२. अशिक्षीत व ग्रामीण भागातील प्रौढांकरीता प्रौढ शिक्षण वर्ग सुरु करणे.

२३. मुलामुलींसाठी विविध स्पर्धांचे आयोजन व प्रयोजन करणे. उदा. निबंध,वकृत्व, गायन, अंताक्षरी, मेहंदी, रांगोळी, नृत्य, चित्रकला, हस्तकला, काव्यवाचन इत्यादी व मुलांना उत्तेजनार्थ बक्षिसे व स्मृतिचिन्ह देणे.

२४. संस्थेमार्फत राष्ट्रीय सण साजरे करणे. उदा. स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन इ.

२५. दुष्काळ, पुर, भुकंप, आग, युद्ध, वादळ, मोठी शस्त्रक्रिया इत्यादी नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या आपादग्रस्तांना सर्वतोपरी मदत व सहाय्य करणे.

२६. कायद्याच्या चौकटीत बसतील असे वरील सर्व उद्देश धर्मादाय स्वरुपात शासनाच्या त्या त्या विभागाच्या पूर्व परवानगीने राबविण्यात येतील.

(4) संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर संस्थेची व्यवस्था सोपविण्यात आलेली आहे. अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची नांवे, पत्ते, राष्ट्रीयत्व, वय, व्यवसाय व हुद्दा हे पुढील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | नांव व पत्ता | वय | राष्ट्रीयत्व | हुद्दा | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्री. मंगेश अशोक भुजबळ<br>वॉर्ड क्र.६, घर नं. २६८०, महाकालेश्वरनगर, मु.पो.शिक्रापूर,ता.शिरुर,जि.पुणे- ४१२ २०८. | ३० | भारतीय | अध्यक्ष | शेती |
| २. | सौ. आशा सतीश कळमकर<br>कळमकर वस्ती,शिक्रापूर,ता.शिरुर, जि.पुणे - ४१२ २०८. | ३३ | भारतीय | उपाध्यक्ष | धंदा |
| ३. | सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर<br>मु.पो.तळेगांव ढमढेरे,बँक ऑफ महाराष्ट्र शेजारी,ता.शिरुर,जि.पुणे- ४१२ २०८. | २९ | भारतीय | सचिव | शेती |
| ४. | सौ. योगिनी प्रशांत भाकरे<br>मु.पो.टाकळी हाजी,माळवाडी,ता.शिरुर, जि.पुणे- ४१२ २०८ | २७ | भारतीय | खजिनदार | नोकरी |

( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) अध्यक्ष

( सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर ) सचिव

( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) खजिनदार

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ५. | श्री. बापू आप्पासो. धरणे<br>मु.पो.तळेगांव ढमढेरे,पांढरी वस्ती,<br>ता.शिरुर,जि.पुणे- ४१२ २०८ | ४० | भारतीय | सदस्य | शेती |
| ६. | श्री. निलेश अशोक भुजबळ<br>वॉर्ड क्र.६, घर नं. २६८०, महाबळेश्वरनगर,<br>मु.पो.शिक्रापूर,ता.शिरुर,जि.पुणे- ४१२ २०८ | ३२ | भारतीय | सदस्य | धंदा |
| ७. | सौ. कमल अशोक भुजबळ<br>वॉर्ड क्र.६, घर नं. २६८०, महाबळेश्वरनगर,<br>मु.पो.शिक्रापूर,ता.शिरुर,जि.पुणे- ४१२ २०८ | ४७ | भारतीय | सदस्य | शेती |
| ८. | सौ. योगिता चंद्रकांत भुजबळ<br>वॉर्ड क्र.६, घर नं. २६८०, महाबळेश्वरनगर,<br>मु.पो.शिक्रापूर,ता.शिरुर,जि.पुणे- ४१२ २०८ | ३३ | भारतीय | सदस्य | शेती |
| ९. | श्रीमती नंदा प्रकाश भुजबळ<br>काळोखे वस्ती,मु.पो.शिक्रापूर,<br>ता.शिरुर,जि.पुणे- ४१२ २०८ | ३५ | भारतीय | सदस्य | शेती |
| १०. | सौ. शिल्पा निलेश भुजबळ<br>वॉर्ड क्र.६, घर नं. २६८०, महाबळेश्वरनगर,<br>मु.पो.शिक्रापूर,ता.शिरुर,जि.पुणे- ४१२ २०८ | ३० | भारतीय | सदस्य | शेती |
| ११. | सौ. उर्मिला मंगेश भुजबळ<br>वॉर्ड क्र.६, घर नं. २६८०, महाबळेश्वरनगर,<br>मु.पो.शिक्रापूर,ता.शिरुर,जि.पुणे- ४१२ २०८ | २८ | भारतीय | सदस्य | शेती |

(5) आम्ही खालील सह्या करणारे **"फिनिक्स वर्ल्ड एज्युकेशन सोसायटी"** संस्थेचे सदस्य जाहिर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असुन वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन **"फिनिक्स वर्ल्ड एज्युकेशन सोसायटी"** ही संस्था आज दिनांक २२/५/२०२५ रोजी स्थापन केली असुन ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

R.S. Todkar

Bhakare

| ( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) | ( सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर ) | ( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

| नांव | सही |
|---|---|
| १. श्री. मंगेश अशोक भुजबळ | Bhujbal |
| २. सौ. आशा सतीश कळमकर | A.S. Kalamkar |
| ३. सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर | R.S. Todkar |
| ४. सौ. योगिनी प्रशांत भाकरे | Y.Bhakare |
| ५. श्री. बापू आप्पासो. धरणे | धरणे बा. आ |
| ६. श्री. निलेश अशोक भुजबळ | [signature] |
| ७. सौ. कमल अशोक भुजबळ | क. अ. भुजबळ |
| ८. सौ. योगिता चंद्रकांत भुजबळ | यो. चं. भुजबळ. |
| ९. श्रीमती नंदा प्रकाश भुजबळ | नंदा प्र. भुजबळ |
| १०. सौ. शिल्पा निलेश भुजबळ | शिल्पा. नि. भुजबळ |
| ११. सौ. उर्मिला मंगेश भुजबळ | [signature] |

वरील लोकांनी माझ्या समोर सह्या केल्या आहेत व त्या सर्वांच्या सह्या मी ओळखतो.

स्थळ : पुणे.

दिनांक : २२/५/२०१५

Adv. Satish M. Pingale
En.No.: MAH /31/1996
S. No. 136/2/2, Tuljai Sadan
Shri Siddhivinayak Colony,
Warje Malwadi, Pune- 58
Mob. No. 9822261494

## " दा ख ला "

आम्ही खाली सह्या करणार प्रतिज्ञापूर्व सांगतो की, आमच्या माहितीप्रमाणे "फिनिक्स वर्ल्ड एज्युकेशन सोसायटी", वॉर्ड क्र.६, घर नं. २६८०, महाबळेश्वरनगर, मु.पो.शिक्रापूर, ता.शिरुर,जि.पुणे - ४१२ २०८, या नांवाची किंवा यासारख्या नांवाची दुसरी संस्था तालुका शिरुर व पुणे जिल्हयात अस्तित्वात नाही किंवा नोंदली गेली नाही.

| | | |
|---|---|---|
| Bhujbal | R.S. Todkar | Y.Bhakare |
| ( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) | ( सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर ) | ( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

महा. 1028 /2015/पुणे
दिनांक 12/8 /2015/पुणे

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

# परिशिष्ट - "क"

## नियम व नियमावली

## फिनिक्स वर्ल्ड एज्युकेशन सोसायटी

वॉर्ड क्र.६, घर नं. २६८०, महाबळेश्वरनगर, मु.पो.शिक्रापूर, ता.शिरुर,जि.पुणे - ४१२ २०८

**(1) संदर्भीय शब्दांची व्याख्या :-**

1. **संस्था :-** संस्था म्हणजे मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन (ज्ञापन) मध्ये नमुद केलेल्या नावाची संस्था.

2. **उद्देश :-** ज्ञापनातील कलम ३ खाली येणारे संस्थेचे उद्देश.

3. **सभासद :-** संस्थेचा सभासद म्हणजे नियम नियमावलीनुसार प्रवेश दिलेली व्यक्ती व जिने आपल्या सदस्यत्वाची वर्गणी दिली आहे.

4. **संस्था नोंदणी अधिनियम :-** संस्था नोंदणी अधिनियम म्हणजे सन १८६० च्या भारत सरकारचा कायदा व त्याखाली येणारे नियम या संस्थेस लागु आहेत.

5. **कार्यकारी मंडळ :-** संस्थेचे कार्यकारी मंडळ म्हणजे संचालक समिती, गव्हर्निंग कौन्सिल, विश्वस्त किंवा इतर मंडळ ज्यांच्याकडे संस्थेचे नियम नियमावलीनुसार व्यवस्थापन सोपविले आहे असे मंडळ.

**(2) संस्थेचे कार्यक्षेत्र :-**

या संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र असे राहील.

**(3) हिशोबाचे वर्ष :-**

या संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

**(4) सभासदत्व :-**

या संस्थेचे ध्येय धोरण व उद्देशांची आवड असलेल्या १८ वर्षे वयाच्या पुढील व्यक्तीस सभासद होता येईल. सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने वर्गणी भरुन संस्थेचा अर्ज २ सभासदांच्या शिफारशीसह अध्यक्षांकडे शिफारशीकरीता पाठविला पाहिजे. व त्यास कार्यकारी मंडळाकडून मंजुरी मिळाल्यानंतर अर्जदार व्यक्तीस सभासदाचे अधिकार प्राप्त होतील. नामंजुर केलेले अर्ज येणाऱ्या वार्षिक व सर्वसाधारण सभेपुढे अंतिम मंजुरीसाठी ठेवले जातील.

| ( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) | ( सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर ) | ( सौ. रागिनी प्रशांत भाकरे ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

Charity Commissioner, Pune



(5) **सभासदांचे प्रकार** :-

1. **संस्थापक सभासद** :-
   संस्थेच्या स्थापनेच्या वेळी ११ जे संस्थेचे सभासद होते व ज्या ११ जणांनी ज्ञापनावर सहया केल्या आहेत, अशा ११ सभासदांना संस्थापक सभासद समजण्यात येईल. त्यांच्या कडून वार्षिक वर्गणी वर्गणी रु. १०१/- घेतली जाईल.
2. **सर्वसाधारण सभासद** :-
   वार्षिक वर्गणी रु. १०१/- देणाऱ्या सभासदास सर्वसाधारण सभासद समजण्यात येईल.त्याचेकडून रु. ११/- प्रवेश फी घेण्यात येईल.

6 **सभासद रद्द होणे** :-

1. सभासद निधन पावल्यास त्या सभासदाचे सभासदत्व रद्द केले जाईल.
2. सभासदाचा राजीनामा कार्यकारी मंडळाने मंजुर केल्यास त्या सभासदाचे सभासदत्व रद्द केले जाईल. तसेच गैरवर्तन व समाजास दिशाभूल करुन निधी जमा करणाऱ्या सभासदास काढून टाकण्यात येईल.
3. सभासदास फौजदारी व नैतिक अध:पाताच्या गुन्हयाबद्दल शिक्षा झालेली असल्यास अगर सभासदाने संस्थेचे नियम, उद्देश व हित यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष विघातक कृत्य केले असल्यास त्या सभासदास आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाईल. व त्यानंतरच त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल.
4. वर्ष सुरु झाले नंतर संस्थेची वर्गणी तीन महिन्यात न दिल्यास त्या सभासदाचे सभासदत्व रद्द केले जाईल.
5. सभासद जर संस्थेच्या व्यवहारात किंवा कारभारात व्यत्यय आणून संस्थेची हानी करत असेल तर त्याचे सभासदत्व ठराव करुन रद्द केले जाईल.
6. सभासदास शारिरीक, मानसिक दुर्बलता येवुन तो अकार्यक्षम ठरला तर त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल.
7. जर एखादा सभासद कायमचा परदेशात वास्तव्यासाठी गेल्यास त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल.
8. जर एखादा सभासद संस्थेच्या होणाऱ्या तीन सलग सभांना गैरहजर राहिल्यास त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल. तसेच कार्यकारणीचा कालावधी संपल्यानंतर सभासदाचे सभासदत्व आपोआप रद्द होईल.

(7) **सर्वसाधारण सभा व तिचे अधिकार आणि कार्य** :-

1. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे वर्ष संपल्यापासून चार महिन्यात घेतली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत वार्षिक सभा वर्ष संपल्यापासून सहा महिन्यात झाली नाही तर ३/५ सभासदांनी एकत्रित येऊन अशी सभा घेण्याबद्दल योग्य तो निर्णय घेऊ शकतील आणि त्यानुसार होणारे सभेतील ठराव मंडळावर बंधनकारक राहतील.

| | | |
|---|---|---|
| (श्री. मंगेश अशोक भुजबळ) | (सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर) | (सौ. योगिनी प्रशांत भाकरे) |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

Asst. Charity Commissioner
Pune



2. मागील सभेचा वृत्तांत, कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमाखर्च, ताळेबंद, अंदाजपत्रक तयार करणे.
3. कार्यकारी मंडळाची निवड करणे किंवा निवडणुकीचे निकाल जाहिर करणे.
4. पुढील वर्षासाठी चार्टर्ड अकौंटट अगर पब्लिक ट्रस्ट ऑडीटर नेमणे.
5. नियम व नियमावलीतील दुरुस्ती असल्यास त्यास मान्यता देणे.
6. ध्येय, धोरण व कार्य यांची चर्चा करणे.
7. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी व इतर सभासदांनी अगोदर नोटीस देऊन सभेपुढे आणलेली कामे करणे.
8. संस्थेमार्फत आवश्यक ते पोटनियम करणे व त्यांना कार्यकारी मंडळाची संमती घेऊन त्यासंबंधी योग्य ते ठराव पास करणे.

## (8) सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या :-

1. कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या दिवशी, वेळी व ठिकाणी सभा भरविण्यात येईल.
2. वार्षिक सभेची नोटीस सभेपुर्वी १८ दिवस अगोदर दिली पाहिजे.
3. नियम व नियमावलीतील दुरुस्ती असेल तर त्याची नोटीस कमीत कमी १५ दिवस अगोदर दिली पाहिजे.
4. वार्षिक सभेची नोटीस स्थानिक वर्तमान पत्रातून दिल्यास उत्तम पण ही गोष्ट बंधनकारक राहणार नाही.
5. सभेची नोटीस प्रत्येक सभासदास पोस्टाने अथवा सही घेऊन देण्यात येईल. तथापी बाहेर गावच्या एखाद्या सभासदास सभेची नोटीस स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर ए. डी. ने पाठवुनही न मिळाल्यामुळे सदर सभेत मंजुर झालेल्या कामकाजास त्याची बाधा येणार नाही.
6. संस्थेला खरोखरी उपयोगी होतील अशा व्यक्तींना निमंत्रित व निरिक्षक म्हणुन कार्यकारी मंडळाच्या सभेत मंजुरी घेऊन बोलाविता येईल पण त्यांना संस्थेच्या मतदानात भाग घेता येणार नाही.
7. सभेला कोरम पटावरील सभासद संस्थेच्या तीन पंचमांश एवढा राहील. पण कोरम अभावी तहकुब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलाविली जाईल. त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही व तिचे सर्व कामकाज कायदेशीर राहील पण वार्षिक सभेच्या नोटीसीत तशी सूचना असणे आवश्यक आहे.

## (9) विशेष सर्वसाधारण सभा :-

कार्यकारी मंडळास सर्व सभासदापुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवावयाची असल्यास अगर एखाद्या विशेष प्रसंगी विशेष सर्व साधारण सभा घेता येईल. त्यावेळी वार्षिक सर्व साधारण सभेचे सर्व नियम पाळले जातील. तसेच पटावरील तीन पंचमांश सभासदांनी लेखी अर्ज केल्यास जादा सर्वसाधारणसभा अध्यक्षांनी बोलाविली पाहिजे.

| | | |
|---|---|---|
| (श्री. मंगेश अशोक भुजबळ) | (सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर) | (सौ. योगिनी प्रशांत भाकरे) |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

**(10) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची रचना :-**

1. सध्या एकंदर ११ सभासदांचे कार्यकारी मंडळ राहील. त्यात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार हे ४ पदाधिकारी व ७ सभासद राहतील. पदाधिकारी हे कार्यकारी मंडळातूनच निवडले जातील. आवश्यकता भासल्यास ज्यादा पदाधिकारी निर्माण करण्यात येतील. किंवा कमी करण्यात येतील.
2. संस्थेच्या कार्यकारी मंडळात कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १५ व्यक्ती असु शकतील.

**(11) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत :-**

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा ५ वर्षाचा राहील. दर ५ वर्षांनी संस्थेची एकुण मतदार यादी तयार करुन वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविण्यात येईल व अशा सभेत वार्षिक सर्वसाधारण सभेचे सभासद नवीन कार्यकारी मंडळाची निवड लोकशाही पध्दतीने किंवा बहुमताने करतील. जुन्या कार्यकारी मंडळाकडून ही निवड केली जाईल. निवडणुक होण्यापुर्वी एक महिना अगोदर सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयात प्रसिध्द केली जाईल. ज्या सभासदांनी आपली वर्गणीची रक्कम पुर्णपणे भरलेली आहे असेच सभासद निवडणुकीत भाग घेण्यास पात्र ठरतील. समसमान मते पडल्यास अध्यक्ष आपल्या पसंतीचे मत (कास्टींग वोट) देतील.

**(12) कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व त्यांची कार्ये :-**

अ. **अध्यक्ष :-**

1. वार्षिक सर्वसाधारण सभा, जादा सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळातील सभेचे अध्यक्षस्थान स्विकारुन नि:पक्षपणे सभा पार पाडणे.
2. समान मत विभागणी झाल्यास निर्णायक जादा मत देणे.
3. संस्थेच्या एकुण कामकाजावर नियमित देखरेख व नियंत्रण ठेवणे.
4. सचिव यांनी संस्थेचे कामकाज सुरळीत व नियमित पार पाडले नाहीतर स्वत:च्या अधिकारात कार्यकारी मंडळाची वार्षिक सभा बोलावणे.
5. संस्थेच्या कागदपत्रावर सह्या करणे.
6. अंतिम आदेश जारी करणे.

ब. **उपाध्यक्ष :-**

अध्यक्षाच्या अनुपस्थितीत अध्यक्षाची सर्व कामे करणे व इतर वेळी अध्यक्षांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मदत करणे.

R.S. Todkar

| ( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) | ( सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर ) | ( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

क. **सचिव** :-

1. संस्थेच्या ध्येय धोरणानुसार व कार्यकारी मंडळाच्या सुचने नुसार संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाणे.
2. संस्थेसाठी पत्रव्यवहार करणे व दप्तर सांभाळणे.
3. वेळोच्या वेळी कार्यकारी मंडळाच्या व संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्षांच्या पुर्व परवानगीने बोलावणे.
4. कार्यकारी मंडळ व नोकरवर्ग यांचा दुवा म्हणुन संबंध ठेवणे व त्यांच्या दैनंदिन कामावर देखरेख ठेवणे व संस्थेचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणुन काम पहाणे.

ड. **खजिनदार** :-

1. संस्थेचे दैनंदिन व वार्षिक जमाखर्चाचे कागदपत्र ठेवणे.
2. सभासदांची वर्गणी, देणगी, व्याज, कर्ज येणे रक्कम जमा करुन सर्वांची मान्य दिले अध्यक्षांच्या व कार्यकारी मंडळाच्या मान्यतेनुसार चुकती करणे.
3. मासिक व वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी मंडळापुढे ठेवणे.
4. हिशोबाच्या संबंधी चोपड्या, पावती बुके, चेकस व पासबुके यांची जबाबदारी पुर्णपणे खजिनदारावर राहील.
5. संस्थेने ठेवलेल्या बँकेत नियमित जमा होणारी रक्कम जमा करणे व त्या अनुषंगाने येणारी सर्व कामे करणे.
6. खजिनदारास दैनंदिन खर्चासाठी रु.५००/- रोख शिल्लक ठेवता येईल.
7. संस्थेची वार्षिक हिशोब विवरणपत्रे म्हणजेच ऑडीट रिपोर्ट दरवर्षी मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे- १, यांच्याकडे नियमितपणे दाखल करणे.

इ. **सदस्य** :-

1. संस्थेच्या होणाऱ्या सभेला उपस्थित राहणे.
2. संस्थेच्या प्रत्येक कामात मदत करणे.

## (13) कार्यकारी मंडळाच्या सभा व मागणीची सभा :-

1. कार्यकारी मंडळाची सभा दर ३ महिन्यातून एक वेळा बोलाविली पाहिजे. अध्यक्षांच्या गैरहजेरीत सचिव सभेचे काम पहातील. कार्यकारी मंडळाचा सभासद पुर्व परवानगी शिवाय सतत ३ सभेत गैरहजर राहिल्यास त्याचे कार्यकारी मंडळावरील सभासदत्व रद्द केले जाईल. पुढील सभेत बहुमताने सदर ठराव मंजुर करण्यात येईल.
2. कार्यकारी मंडळाच्या ३/५ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास कार्यकारी मंडळाची सभा अध्यक्षांनी बोलाविली पाहिजे. अध्यक्षांनी एक महिन्याचे आत अशी सभा घेतली नाहीतर सभा मागणी करणारे सभासद सभा बोलावू शकतील. त्यावेळी कार्यकारी मंडळाच्या सभेचे सर्व नियम पाळले जातील.

R.G. Tolkar

| ( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) | ( सौ. रोहिणी सुदर्शन तोळकर ) | ( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

Asst. Charity Commissioner Pune



## (14) कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :-

सभासदांना सभेपूर्वी सात दिवस अगोदर नोटीस पाठवणे आवश्यक आहे. पण तशाच प्रसंगी अध्यक्षांस फक्त एक दिवसाची समक्ष सही घेवून नोटीस देवुन तातडीने सभा बोलावण्याचा अधिकार राहील.पोस्टाने केलेवार स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर ए. डी. ने पाठवलेली नोटीस एखादया सभासदास मिळाली नाहीतर त्यामुळे बोलावलेली सभा बेकायदेशीर ठरणार नाही. विशेष प्रसंगी बैठेच्या अभावी एखादया तातडीच्या कामासाठी निर्णय घेणे झाल्यास सचिव हा अध्यक्षांच्या परवानगीने कार्यकारणीच्या सभासदांकडे लेखी मत मागवुन घेईल व मताधिक्यावरुन तो ठराव अगर निर्णय संमत वा असंमत झाला असे समजण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या सभेत 3/५ चा कोरम असावा पण कोरम अभावी तहकुब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलाविली जाईल. त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही.

## (15) कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :-

1. जुन्या कार्यकारणीतील निवडणुकीस इच्छुक नसणाऱ्या सभासदास निवडणूक अधिकारी म्हणून नेमले जाईल. जुनी कार्यकारणी त्याकरीता नियम तयार करेल. व निवडणुकीचा निकाल जाहिर करतील.
2. ज्या वर्षी निवडणूक असेल त्या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा नोटीसीमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात येईल व उमेदवारी अर्ज मागविण्यात येतील.
3. कार्यकारी मंडळाची निवडणुक वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या मधुन लोकशाही पध्दतीने किंवा निवडणूक पध्दतीने मतदान होईल.

## (16) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :-

मृत, राजीनामा अगर अन्य कारणाने कार्यकारी मंडळातील पद रिक्त झाल्यास कार्यकारी मंडळातील राहीलेले अन्य सदस्य बहुमताने उर्वरित काळाकरीता ते पद भरतील व तसा बदल अर्ज विहीत नमुन्यात मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब पुणे क्षेत्र यांना सादर करतील.

## (17) कार्यकारी मंडळाचे कार्य व अधिकार :-

1. संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाणे, नोकर वर्गाची नेमणूक करणे, वेतन, विमा, प्राव्हिडंट फंड, बोनस, सेवानिवृत्ती करणे व इतर गोष्टींबाबत नियम करणे. संस्थेच्या देण्याघेण्याचे व्यवहार पहाणे, नविन समित्या उपसमित्या नेमणे या संस्थेच्या ध्येय धोरणानुसार इतर कामे करणे.

R.S. Todkar

Obhakare

| | | |
|---|---|---|
| ( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) | ( सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर ) | ( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

2. हिशेब तपासणीसाकडून जमाखर्च व ताळेबंदपत्रक तयार करुन तसेच अहवाल तयार करुन घेवुन वार्षिक सभा घेणे. सभेचे हिशेब सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार ठेवुन त्याचे परीक्षण चार्टर्डअकौंटंट अगर पब्लिक ट्रस्ट ऑडीटर कडून करुन घेवुन विहीत नमुन्यामध्ये मे. सहाय्यक संस्था निबंधक साहेब पुणे क्षेत्र यांचेकडे दरवर्षी ठराविक मुदतीत पाठवणेची तजवीज करावी.
3. सरकारकडून अगर स्थानिक अधिकाऱ्याकडून सोपविलेले आवश्यक कार्य करणे. उद. संग्रहालयाची देखभाल करणे.
4. पुढील कार्याची दिशा अंदाजपत्रक तयार करुन वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.
5. संस्थेचे देण्याघेण्याचे व्यवहार पहाणे, शाखा प्रमुख नेमणे, त्यांचे कार्य, अधिकार व कालावधी ठरविणे व निर्माण केलेल्या समित्या / पदे रद्द करणे व या संस्थेच्या ध्येय धोरणानुसार इतर कामे करणे.
6. संस्थेच्या नियम व नियमावलीतील दुरुस्ती, नविन कार्य अगर इतर शिफारशीसह वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.
7. वार्षिक सभेने केलेले ठराव, आदेश व धोरण विषयी गोष्टी अंमलात आणणे.
8. संस्थेने नेमलेल्या व्यक्तींची संबंधीत माहिती तसेच विवरणे सन १८६० च्या संस्था नोंदणी नियम क्रमांक ८ अन्वये अनुसूची २ मध्ये नमुन्यात मे. सहाय्यक संस्था निबंधक साहेब पुणे क्षेत्र यांचेकडे दरवर्षी पाठविण्यात येईल.
9. संस्थेतर्फे कायदेशीर कारवाई करणे, प्रतिनिधी नियुक्त करणे, वकील वगैरे नियुक्त करणे व इतर आवश्यक खर्च करणे.

## (18) संस्थेचा निधी, मिळकत व विनीयोग :-

संस्थेचा निधी वाढविण्यासाठी देशी व परदेशी देणग्या गोळा करता येतील. अन्य कायदेशीर मार्गाने निधी गोळा करता येईल.तसेच सरकारी, निमसरकारी, खाजगी, अनुदान,सभासदांची वर्गणी या प्रकाराचा उपयोग करावा. कार्यकारी मंडळास मान्य असलेल्या अटीवर देणग्या व मदत स्विकारता येईल. संस्थेच्या निधीचा विनियोग हा संस्थेच्या उद्देशा करीताच केला जाईल. यापुढे देणगी, वर्गणी, भेटवस्तु, अनुदान, बक्षिसे, खरेदी, संपादित केलेली मिळकत ही संस्थेची मिळकत म्हणुन समजण्यात येईल.

## (19) कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद :-

संस्थेस कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येईल मात्र त्यापुर्वी मु. सा. वि. व्य. १९५० चे कलम ३६ व ३५ प्रमाणे मे. धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांची रितसर पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच ठेवी अथवा बिनव्याजी ठेवी स्विकारता येतील.

Rusbaju R.S.Todkar Y.Bhakare

( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) अध्यक्ष

( सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर ) सचिव

( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) खजिनदार

**(20) स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करण्याबाबतची तरतुद :-**

संस्थेस योग्य वाटल्यास स्थावर मिळकत खरेदी करता येईल. मात्र स्थावर मिळकतीची विक्री करावयाची असल्यास अथवा गहाण, तबदील करण्याची असल्यास मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था १९५० चे कलम ३६ अन्वये मे. धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांची रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे.

**(21) बँक खाते :-**

संस्थेजवळ शिल्लक असलेली रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मान्यता असलेल्या शेड्युल बँकेत किंवा सहकारी बँकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल. सदरील बँक खाते हे अध्यक्ष, सचिव, खजिनदार या तिघापैकी कोणाच्याही संयुक्त सहीने चालवता येईल. अध्यक्षांची सही ही कायम राहील. संस्थेची रोख रक्कम रुपये ११११/- ही सुरुवातीचा निधी (कॉरपस) बँकेत खाते उघडल्यानंतर ते बँकेच्या खात्यावर जमा करावेत व तेथुन पुढे संस्थेचे आर्थिक व्यवहार सुरु करावे.

**(22) सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :-**

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियम कलम १५ अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसुची सहावे नमुन्यात ठेवण्यात येईल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ प्रमाणे व १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ७प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसुची एकच्या नमुन्यात आपल्या विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकांच्या कार्यालयात पाठवावी लागेल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम - अ प्रमाणे १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ८ प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरी लागलेल्या व्यक्तींच्या नोकरी संबंधी अटी बाबतचे विवरण अनुसुची दोनच्या नमुन्यात आपल्या विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकांच्या कार्यालयात पाठवावी लागेल.

**(23) नियम व नियमावलीतील बदल करण्याबाबतची तरतुद :-**

कार्यकारी मंडळाने अगर सभासदांनी चालु नियम नियमावलीमध्ये दुरुस्ती सुचवली असेल तर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने मंजुर करण्यात येईल. पण त्यास कार्यकारी मंडळाची संमती असणे आवश्यक आहे. मात्र घटना दुरुस्तीचा मसुदा प्रत्येक सभासदाला नोटीसी बरोबर पाठविला पाहिजे.

| | | |
|---|---|---|
| ( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) | ( सौ. रोहिणी सुदर्शन तोडकर ) | ( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

## (24) संस्थेच्या नांवात व उद्देशात बदल करण्याबाबतची तरतुद :-

1. संस्थेचे नाव अथवा उद्देश यात बदल करावयाचा असेल तर अथवा दोन संस्थाचे विलिनिकरण करावयाचे असेल तर सन १८६० च्या संस्था नोंदणी कायद्यातील अधिनियमातील कलम १२ अथवा १२ (अ) यातील असणाऱ्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.
2. संस्थेला आयकर अधिनियम १९६१ अंतर्गत कलम ८० ग नुसार कर माफी दाखला घेण्यासाठी अर्ज करावयाचा असल्यास व ८० ग नुसार करमाफी दाखला घेतल्यास संस्थेच्या उद्दीष्टांमध्ये बदल करावयाचे असल्यास कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स, पुणे - १, यांच्याकडे सदरची प्रत माहितीसाठी पाठविली जाईल.

## (25) उद्दीष्टनिहाय खर्चाची तरतुद (टक्केवारी प्रमाणे) :-

उद्दीष्टनिहाय खर्चाची तरतुद अंदाजे खालील प्रमाणे राहील

| | |
|---|---|
| संस्थेच्या उद्देशांवर | 80% |
| संस्थेच्या व्यवस्थापनावर | 20% |
| एकुण : | 100% |

## (26) विसर्जन :-

1. संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास ३/५ सभासदांच्या बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्व प्रकारचे देण्याघेण्या बाबतचे व्यवहार पुर्ण करावे लागतील. तसेच संस्थेची शिल्लक मालमत्ता अन्य दुसऱ्या संस्थेला दान म्हणुन देता येईल. १८६० चे संस्था अधिनियमाचे कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पुर्ण करावी लागेल.
2. संस्थेला आयकर अधिनियम १९६१ अंतर्गत कलम ८० ग नुसार कर माफी दाखला घेण्यासाठी अर्ज करावयाचा असल्यास व ८० ग नुसार करमाफी दाखला घेतल्यास संस्थेचे विसर्जन करावयाचे असल्यास कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स, पुणे - १, यांच्याकडे सदरची प्रत माहितीसाती पाठविली जाईल.

### " दा ख ला "

श्री. सागर महादेव पांढरे
विशेष कार्यकारी अधिकारी (८६९५)
शिक्रापूर, ता. शिरुर जि.पुणे.

दाखला देण्यात येतो की, "फिनिक्स वर्ल्ड एज्युकेशन सोसायटी", वॉर्ड क्र.६, घर नं. २६८०, महाबळेश्वरनगर, मु.पो.शिक्रापूर, ता.शिरुर,जि.पुणे - ४१२ २०८, या संस्थेच्या नियम व नियमावलीची ही खरी प्रत असुन ती बरोबर आहे.

स्थळ : पुणे
दिनांक : २४/५/२०१५

| ( श्री. मंगेश अशोक भुजबळ ) | ( सौ. रोहिणी सुदर्शन लोहकर ) | ( सौ. योगिनी प्रशांत भाकरे ) |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

=*=*=*=*=*=*=*=*=*= प्रती शिक्याची खरी नक्कल

मी नक्कल तयार केली
मी वाचली
मी रुजुवात केली

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय पुणे विभाग पुणे